संशोधन आराखडा

“ब्राह्मणेतर चळवळीतील राजर्षी शाहू छत्रपतींची भूमिका : एक राजकीय अभ्यास”

स्वामी रामानंद तीर्थ मराठवाडा विद्यापीठ, नांदेड

मानव्य विद्याशाखेअंतर्गत राज्यशास्त्र विषयातील पीएच.डी. (विद्यावाचस्पती)

या पदवीकरिता सादर केला जाणारा संशोधन आराखडा

संशोधक

प्रसाद दत्तात्रय आमगे

एम.ए., सेट

मार्गदर्शक

प्रा.डॉ.विश्वंभर धर्मा गायकवाड

एम.ए., पीएच.डी., एलएलएम

सहयोगी प्राध्यापक व राज्यशास्त्र विभागप्रमुख

शिवाजी महाविद्यालय, उदगीर जि.लातूर

संशोधन केंद्र

पीपल्स महाविद्यालय, नांदेड

सप्टेंबर - २०२२

“ब्राह्मणेतर चळवळीतील राजर्षी शाहू छत्रपतींची भूमिका : एक राजकीय अभ्यास”

प्रस्तावना

महाराष्ट्राच्या समाजसुधारणेच्या पर्वातील एक अत्यंत महत्त्वाचे व्यक्तिमत्त्व म्हणजेच छत्रपती राजर्षी शाहू महाराज होय. ते कोल्हापूर संस्थानाचे राजे होते. आधुनिक काळात विशेषतः महाराष्ट्रात अनेक समाजसुधारकांनी समाजसुधारणेत महत्त्वपूर्ण योगदान दिले. त्यापैकी कोल्हापूर संस्थानाचे राजे राजर्षी शाहू महाराज हे एक होते. शाहू महाराजांच्या जाणतेपणामुळे, कर्तृत्वामुळे, दूरदृष्टीमुळे, वेदोक्त प्रकरणामुळे बहुजन समाजात नवचैतन्य, नवजाणीवा, नवजागरण आणि नवविचारांची लाटच निर्माण झाली. बहुजन समाजाच्या सर्वांगीण विकासाला शाहू महाराजांचे योगदान ही एक ऐतिहासिक घटना मानली जाते.

शाहू महाराजांच्या या प्रागतिक दृष्टिकोनाचा वारसा त्यांना महात्मा फुले व त्यांचा सत्यशोधक समाज, बडोद्याचे महाराज सयाजीराव गायकवाड व त्यांच्या सुधारणा, हिंदूंमधील विविध सुधारणा चळवळी उदा : आर्यसमाज, दक्षिणेतील मद्रास येथील ब्राह्मणेतर चळवळ (जस्टीस चळवळ), अमेरिकन विचारवंत बुकर-टी-वॉशिंग्टन, अमेरिकन प्रेस्बीटेरिअन मिशन इ. कार्याने व विचारसरणीने विशेष प्रभावित झाले होते. पण या सर्वांच्या केंद्रस्थानी आहे ते वेदोक्ताचे शल्य. म. फुले यांच्यानंतर दलितांच्या उद्धाराची चळवळ खंबीरपणे पुढे चालविणारे थोर समाजसुधारक म्हणून राजर्षी शाहूंची महाराष्ट्राच्या इतिहासात प्रतिमा आहे. शाहू महाराजांनी लोकोत्तर जे कार्य केले ते ब्राह्मणेतरांची सामाजिक व धार्मिक पुनर्घटना हे होय. महाराजांच्या कार्याचा वसा पुढे भाऊराव पाटील, डॉ.बाबासाहेब आंबेडकर, केशवराव जेधे, मुकुंदराव पाटील, भास्करराव जाधव, दिनकरराव जवळकर, शंकरराव मोरे, बापूसाहेब लठ्ठे इ. नेत्यांनी महाराजांच्या पश्चात पुढे चालविला.

शाहूंच्या व्यक्तिमत्त्वाला व कार्याला सामाजिक क्रांतिकारकत्वाचे परिणाम प्राप्त झाले ते वेदोक्त प्रकरणामुळे. हे प्रकरण त्यांच्या जीवनात घडले नसते तर महाराष्ट्रातील सामाजिक चळवळ गतिमान झाली नसती. मराठ्यांच्या वा क्षत्रियांच्या दृष्टीने हा संघर्ष सामाजिक न्यायाचा, सामाजिक हक्काचा आणि सामाजिक स्वाभिमानाचा होता. ब्राह्मणेतरांच्या स्वाभिमानासाठी, हक्कासाठी, न्यायासाठी, अभ्युदयासाठी आणि उत्कर्षासाठी ही आपणास अधिक जोमाने काम करावे लागेल हे त्यांनी ओळखले होते. पुढे वेदोक्तामधील स्वानुभवामुळे सर्व हिंदूंना वेदाधिकार देणाऱ्या आर्य समाजाकडे महाराज आकर्षित झाले. या वेदोक्त प्रकरणामुळे सर्व ब्राह्मणेतर वर्गामध्ये जागृतीचे नवे वारे निर्माण झाले. त्यामुळे धार्मिक व सामाजिक सुधारणेकडे त्यांची दृष्टी वळली. याचा परिणाम म्हणून मराठा पुरोहित, क्षात्रजगद्‌गुरु पीठाची स्थापना, थिऑसफीकल सोसायटी, आर्यसमाज, सत्यशोधक समाज, ब्राह्मणेतर चळवळी या पुरोगामी सुधारणांकडे महाराज वळले. महाराष्ट्रात कार्यकर्त्यांची एक फौजच उभी केली होती.

ब्राह्मणेतर चळवळ ही लोकशाहीवादी चळवळ होती. तसेच ती समान संधी देणारी सांस्कृतिक क्रांती होती. सामाजिक न्याय हाच या चळवळीचा आत्मा होता. शाहू महाराजांनी त्यांना राजकीय हक्कांविषयी जागृत केले. कारण त्यांना माँटेग्यू चेम्सफर्ड सुधारणांद्वारे बहुजनांना राजकीय हक्क किंवा प्रतिनिधित्व मिळवून द्यावयाचे होते. महाराष्ट्रातील ब्राह्मणेतर चळवळीचा हेतू समाजविभाजन हा नव्हता, तिचा हेतू समाजसुधारणेचा होता.

ब्राह्मणेतर समाज यामध्ये शेतकरी, शेतमजूर, कामगार, सैनिक, बलुतेदार, गोरगरीब, कष्टकरी, अपृश्य वर्ग यांची 'बहुजन समाज' किंवा 'ब्राह्मणेतर समाज' या नावाखाली शाहू महाराजांनी शक्ती उभी केली. या दरम्यान मद्रासचे ब्राह्मणेतराचे पुढारी डॉ.माधवन नायर यांच्या सहकार्याने ब्राह्मणेतर चळवळ मजबूत केली. ब्राह्मणेतर चळवळीची उद्दिष्ट्ये म्हणजे जनतेचे शिक्षण, अस्पृश्यतेचे व जातीभेदाचे निर्मूलन, लोकसंघटन, वतनदारीचे उच्चाटन, सहकारी व स्थानिक स्वराज्य संस्था यांच्याद्वारे लोकांना दिलेले चालकत्वाचे प्रशिक्षण, राज्यकारभारातील संतुलन, लोकाभिमुख व

लोककल्याणकारी दृष्टिकोन व सामाजिक बांधिलकीचे बंधन इ. होती. ब्राह्मणेतरांना राजकीय हक्क मिळवून देण्यासाठी त्यांनी 'डेक्कन रयत असोसिएशन' नावाची राजकीय संस्था स्थापन केली.

महाराष्ट्राच्या इतिहासात ब्राह्मणेतर चळवळीचे प्रकटीकरण १९१७ च्या सुमारास झाले. ब्राह्मणेतरांच्या राजकीय हक्कांच्या मागणीसाठी सुरू केलेली चळवळ असे तिचे स्वरूप असले तरी तिची बिजे म. फुले यांच्या सत्यशोधक चळवळीत व स्वतः शाहू महाराजांच्या वेदोक्त चळवळीत पेरली गेली होती. पण या पुढे जाऊन असे म्हणता येईल की, सत्यशोधकाची चळवळ ही महाराष्ट्रातील ब्राह्मणेतरांची पहिली चळवळ होती. तर महाराजांनी सुरू केलेली वेदोक्ताची चळवळ ही ब्राह्मणशाहीच्या मक्तेदारी विरुद्ध व अन्यायाविरुद्ध सुरू केलेली ब्राह्मणेतरांची दुसरी चळवळ होती. याशिवाय ब्राह्मणेतर चळवळीतील शाहू महाराजांच्या योगदानाचा दुसरा महत्त्वाचा पैलू म्हणजे त्यांनी मद्रासकडील ब्राह्मणेतर चळवळीशी साधलेला संपर्क हे आदान-प्रदान १९१९ ते १९२१ या कालखंडात डॉ.माधव नायर, सर पी. त्यागराज चेट्टी, सी. महेश मुदलियार, सर शंकरन नायर इ. नेत्यांशी घनिष्ट संबंध प्रस्थापित झाले होते. महाराष्ट्रातील नेत्यांत भास्करराव जाधव, अण्णासाहेब लठ्ठे, वालचंद कोठारी, मुकुंदराव पाटील, श्रीपतराव शिंदे, महादेव डोंगरे, सी.के. बोले, के.सी. ठाकरे इ. नामांकित नेते ही चळवळ पुढे नेत होते. दुर्दैवाने १९२२ ला छत्रपती शाहू महाराजांचे निधन झाले. ब्राह्मणेतर चळवळीची राजकीय वाटचाल ते जास्त काळ पाहू शकले नाहीत. त्यांच्या पश्चात सर्वांना मार्गदर्शन करणारा, शिस्त लावणारा नेता मिळाला नाही. सन १९३२ पर्यंत ही चळवळ चालू होती. याच काळात बाबासाहेब आंबेडकरांच्या नेतृत्वाखाली १९२७ पासून दलित मुक्ती चळवळीची वाढ झाली. टिळकांच्या मृत्यूनंतर कॉंग्रेसच्या नेतृत्वाखाली चाललेल्या स्वतंत्र चळवळीची सूत्रे म.गांधींच्या हातात आली. कॉंग्रेस पक्षावरील ब्राह्मणांचा प्रभाव हळूहळू कमी झाला. पुढे १९३४ नंतर मुंबई इलाख्यातील ब्राह्मणेतर पक्षातील मोठा गट केशवराव जेध्यांच्या नेतृत्वाखाली कॉंग्रेसमध्ये शिरला आणि ब्राह्मणेतर चळवळ हळूहळू संपुष्टात आली.

प्रस्तुत शोधप्रबंधात राजर्षी शाहू महाराजांचे ब्राह्मणेतर चळवळतील नेतृत्व व योगदानाचा राजकीय अंगाने अभ्यास केला जाणार आहे. त्यासोबतच सुधारणावादी कार्याचाही चिकित्सक पद्धतीने आढावा घेतला जाणार आहे.

संशोधनाचे महत्त्व

छत्रपती राजर्षी शाहू महाराजांनी त्यांच्या कोल्हापूर संस्थानात ज्या सुधारणात्मक चळवळी सुरू केल्या व त्या चळवळीत त्यांनी घेतलेल्या क्रियाशील सहभाग यामुळे संस्थानातील बहुजन समाजाच्या सामाजिक, आर्थिक व राजकीय क्षेत्रात घडून आलेला बदल हा उल्लेखनीय समजला जातो. ब्राह्मणेतर चळवळीचा उदय हा महात्मा फुलेंच्या सत्यशोधक चळवळीपासून झाला. म्हणजेच सत्यशोधक ते ब्राह्मणेतर या प्रवासात ब्राह्मणेतर चळवळ ही प्रामुख्याने राजकीय चळवळ म्हणजेच प्रशासन व राजकारणातील ब्राह्मणी वर्चस्व मोडीत काढणे आणि शुद्र व क्षत्रिय या सामाजिक घटकांना प्राधान्य देण्यासाठी निर्माण झालेली होती.

प्रस्तुत संशोधन हे राजर्षी शाहू महाराजांनी ब्राह्मणेतर चळवळीला पाठिंबा देण्याचे प्रयोजन व त्या अनुषंगाने हाती घेतलेले कार्य आणि त्या कार्याचा महाराष्ट्राच्या सत्ताकारणावर झालेला परिणाम व त्याचे राजकीय विश्लेषण या अंगाने अतिशय महत्त्वाचे स्थान आहे. आतापर्यंत शाहू महाराजांवर समाजशास्त्रीय, चरित्रात्मक अंगाने भरपूर संशोधन व अभ्यास झालेला आहे. पण ब्राह्मणेतर चळवळीमुळे बहुजन समाजात राजकीय आत्मभान रुजविण्याचे कार्य शाहू महाराजांनी कसे केले आणि बहुजन समाजातील अनेक राजकीय नेते पुढे महाराष्ट्राच्या राजकारणात कसे आपले स्थान निर्माण केले या सर्वांचा सुधारणात्मक व राजकीय अंगाने अभ्यास दुर्लक्षित राहिलेला आहे. आजच्या बहुजन नेतृत्वाची मुहुर्तमेढ ही छत्रपती शाहू महाराजांच्या कार्यात व दृष्टीत दिसून येते. हे या संशोधनाचे विशेष महत्त्व असणार आहे.

अशा प्रकारे ब्राह्मणेतर चळवळ व शाहू महाराज यांचे सुधारणात्मक व राजकीय विश्लेषण या प्रस्तुत अभ्यासातून होणार आहे.

उद्दिष्टे

- सत्यशोधक ते ब्राह्मणेतर चळवळ व त्यांच्या ध्येयधोरणांचा आढावा घेणे.
- राजर्षी शाहू महाराजांचे महाराष्ट्रातील विविध चळवळीतील योगदान अभ्यासणे.
- राजर्षी शाहू महाराजांचे ब्राह्मणेतर चळवळीतील भूमिका व कार्य यांचा आढावा घेणे.
- राजर्षी शाहू महाराजांच्या ब्राह्मणेतर चळवळीच्या नेतृत्वामुळे ब्राह्मणेतर समाजातील सुधारणेचा आढावा घेणे.
- राजर्षी शाहू महाराजांच्या ब्राह्मणेतर चळवळीच्या नेतृत्वामुळे महाराष्ट्राच्या राजकारणात झालेल्या बदलाचा अभ्यास करणे.
- ब्राह्मणेतर चळवळ व शाहू महाराजांचे योगदान याचा महाराष्ट्राच्या सामाजिक सुधारणा व इतर चळवळीवर पडलेल्या प्रभावाचा अभ्यास करणे.

गृहितके

- वेदोक्त प्रकरणामुळे राजर्षी शाहू महाराज ब्राह्मणेतर चळवळीकडे वळले.
- ब्राह्मणेतर चळवळ ही सामाजिक व राजकीय होती.
- राजर्षी शाहू महाराजांचे जस्टीस चळवळीतील नेत्यांसोबत घनिष्ठ संबंध होते.
- शाहू महाराजांची ओळख ही पुरोगामी राजा म्हणून आहे.
- राजर्षी शाहू महाराजांमुळे ब्राह्मणी वर्चस्वाला शह बसला व प्रशासनात ब्राह्मणेतर मंडळी आली.
- राजर्षी शाहू महाराजांच्या ब्राह्मणेतरी दृष्टिकोनामुळे बहुजन समाजातील अनेक नेते महाराष्ट्राच्या राजकारणात पुढे आले.

संशोधन पद्धती

प्रस्तुत विषय ऐतिहासिक असल्याकारणाने ऐतिहासिक पद्धतीची ज्ञानसाधनांच्या आधारे तथ्यसंकलन केले जाईल. यामध्ये दुय्यम स्रोतांत उपलब्ध असलेल्या प्रकाशित व

अप्रकाशित साहित्याचा उपयोग केला जाईल. यामध्ये खालील बाबींचा उपयोग व आधार माहिती संकलनासाठी घेतला जाईल.

१) **व्यक्तिगत कागदपत्रे :** यात राजर्षी शाहूंचा पत्रव्यवहार, त्यांच्याविषयी लिहिल्या गेलेल्या आठवणी, वैयक्तिक लेख, मुलाखत इ. वैयक्तिक कागदपत्रांच्या आधारे तथ्य संकलन केले जाईल.

२) **सार्वजनिक कागदपत्रे :** शाहू महाराजांविषयी इतरांचे लिखाण त्याचप्रमाणे राजर्षी शाहू महाराजांवरील साहित्य, संदर्भ ग्रंथ, लेख, विविध मासिक व नियतकालिकांतून त्यांच्या कार्यावर प्रकाश टाकणारे लेख, एम.फिल, पीएच.डी. शोधप्रबंध, इंटरनेटवरील विविध संकेतस्थळे इ. साधनांचा आधार घेण्यात येईल.

३) **करवीर संस्थानाचे अहवाल :** यात विविध जाहिरनामे, अहवाल, गॅझेटस, गॅझेटिअर इ. वापर करण्यात येणार आहे.

प्रकरण मांडणी

प्रकरण पहिले

ब्राह्मणेतर चळवळीची पार्श्वभूमी व ध्येयधोरणे

प्रकरण दुसरे

शाहू महाराजांचे विविध चळवळीतील योगदान

प्रकरण तिसरे

राजर्षी शाहू महाराज व ब्राह्मणेतर चळवळ

प्रकरण चौथे

शाहू महाराजांचे ब्राह्मणेतर नेतृत्व व महाराष्ट्राचे राजकारण

प्रकरण पाचवे

शाहू महाराजांच्या ब्राह्मणेतर चळवळीतील योगदानाचे मूल्यमापन

प्रकरण सहावे

निष्कर्ष

संदर्भ ग्रंथ सूची

१) पवार जयसिंगराव (२००७), राजर्षी शाहू स्मारक ग्रंथ

२) धनंजय कीर (१९७९), राजर्षी शाहू छत्रपती : एक सामाजिक राजा

३) रा.तु. भगत (२००३), राजर्षी शाहू छत्रपती जीवन व कार्य

४) नागोराव कुंभार (१९९२), राजर्षी शाहू महाराज

५) य.दि. फडके (१९८६), शाहू छत्रपती आणि लोकमान्य

६) रा.ना. चव्हाण (२००२), लोकनेते राजर्षी शाहू महाराज काळ व कार्य

७) नानासाहेब साळुंखे (२००६), शाहूंच्या आठवणी

८) वसुधा ज. पवार (२००४), राजर्षी छत्रपती एक अभ्यास

९) नाईक टी.बी. (१९७४), छत्रपती राजर्षी शाहू महाराज, युनिव्हर्सल पब्लिकेशन

१०) माधवराव बागल (१९५०), श्री शाहू महाराज यांच्या आठवणी

११) जाधव रमेश (२००२), लोकराजा शाहू छत्रपती

मार्गदर्शक ***संशोधक***

प्रा.डॉ.विश्वंभर धर्मा गायकवाड
एम.ए., पीएच.डी., एलएलएम

प्रसाद दत्तात्रय आमगे
एम.ए., सेट